## प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक


१.१ संशोधनाची पार्श्वभूमी

१.२ समस्येची निवड

१.३ समस्या विधान

१.४ संशोधनाची उदिदष्टे

१.५ समस्येचे महत्व व गरज

१.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१.७ प्रकरणांचे नियोजन

संदर्भ

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

## १.१ संशोधनाची पार्श्वभूमी :-

भारतात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणात एकसूत्रीपणा निर्माण करण्याची आणि व्यावसायिक शिक्षणाची तरतूद करण्याची गरज भासल्यानंतर भारत सरकारने डॉ.डी.एस.कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली १९६४-६६ या कालावधीत माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणात एकसूत्रीपणा आणण्यासाठी व व्यावसायिक शिक्षणाच्या अंमलबजावणीसाठी शिक्षण आयोगाची नेमणूक केली.या आयोगाने देशभर शिक्षणात एकसूत्रीपणा आणण्यासाठी व व्यावसायिक शिक्षणासाठी १०+२+३ हा नवा आकृतीबंध राबविण्याची सरकारला शिफारस केली.

भारतीय संसदेने " राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८" नुसार १०+२+३ हा शैक्षणिक आकृतीबंध देशभर राबविण्याचे मान्य केले. केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी १२ मे १९७२ मध्ये नवी दिल्ली येथे सर्व घटक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक घेऊन १०+२+३ हा नवा आकृतीबंध प्रत्येक घटक राज्यात राबविण्याची शिफारस केली. त्याप्रमाणे सर्व राज्यांनी हा नवा शैक्षणिक आकृतीबंध राबविण्याचे ठरविले.

या नव्या आकृतीबंधाची उद्दिष्टे आयोगाने पुढीलप्रमाणे ठरविलेली होती.[१]

१) १६ ते १९ वर्षे या वयोगटातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक व तांत्रिक सोयी उपलब्ध करुन देणे.

२) व्यावसायिक व बहुद्देश्यीय शाळा स्थापन करणे.

३) या बहुद्देश्यीय शाळांमधून कला,विज्ञान,शेती,गृहशास्त्र,तंत्रशास्त्र इत्यादी विषयाचे शिक्षण देण्याची सोय करणे.

४) कनिष्ठ महाविद्यालयात प्रायोगिक प्रशिक्षित व संशोधक वृत्तीचा शिक्षक वर्ग उपलब्ध करुन देणे.

५) या स्तरावर विद्यापीठ शिक्षणाची पूर्वतयारी करुन घेणे.

६) या स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये सुयोग्य वृत्तींची जोपासना करणे.

७) विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक,सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांचे संवर्धन करणे.

८) विद्यार्थ्यांमध्ये कौशल्याची निर्मिती करणे.

९) विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची वाढ करणे.

१०) विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रनिष्ठेची भावना निर्माण करणे.

कोठारी आयोगाने शिक्षणाची उद्दिष्टे वरीलप्रमाणे स्पष्ट करुन शिक्षणाच्या नव्या आकृतीबंधाचे स्वरुप खालीलप्रमाणे स्पष्ट केले.[२]

१) एक ते तीन वर्षापर्यंत शालेय प्रवेशपूर्व शिक्षण असावे.

२) सात ते आठ वर्षाचे प्राथमिक शिक्षण असावे व त्याचे प्राथमिक व उच्च प्राथमिक असे दोन टप्पे असावेत.

३) दोन किंवा तीन वर्षाचे माध्यमिक शिक्षण असावे.

४) उच्च माध्यमिक शिक्षणाचा दोन वर्षाचा टप्पा असावा. त्यामध्ये व्यावसायिक शिक्षण देण्यात यावे.

५) पहिल्या पदवी परिक्षेपर्यंतचे उच्च शिक्षण हे तीन वर्षाचे असावे.

कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्यात १९७५-७६ या शैक्षणिक वर्षापासून १०+२+३ या शिक्षणाच्या आकृतीबंधांतर्गत " उच्च माध्यमिक" किंवा "कनिष्ठ महाविद्यालय" हा नवा स्तर सुरु करण्यात आला. या +२ स्तरास "उच्च माध्यमिक" किंवा "कनिष्ठ महाविद्यालय"असे म्हणतात. कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरांमध्ये इयत्ता ११ वी आणि इयत्ता १२ वी या दोन्ही वर्गाचा समावेश होतो. महाराष्ट्रात जून १९७५ पासून इयत्ता ११ वी च्या आणि जून १९७६ पासून इयत्ता १२ वी च्या वर्गाची सूरुवात झाली.

महाराष्ट्र सरकारने १९७५-७६ मध्ये इयत्ता ११ वी चे वर्ग प्रामुख्याने निवडक माध्यमिक शाळांना व काही वरिष्ठ महाविद्यालयांना उघडण्यास परवानगी दिली.१९७६-७७ मध्ये इयत्ता १२ वी चे वर्ग काही माध्यमिक शाळांमध्ये व काही

वरिष्ठ महाविद्यालयामध्ये सुरु झाले. अशा रितीने कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग माध्यमिक शाळांशी व वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न करण्यात आले.

जेथे माध्यमिक शाळांना जोडून उच्च माध्यमिकचे वर्ग आहेत तेथे त्या शाळांचे मुख्याध्यापक उच्च माध्यमिक वर्गाचे नियोजन आणि प्रशासन पाहतात. जेथे हे वर्ग वरिष्ठ महाविद्यालयांना जोडलेले आहेत तेथे त्या वरिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य कनिष्ठ महाविद्यालयांचे नियोजन आणि प्रशासन पाहतात.अशा रितीने +२ स्तरांच्या उच्च माध्यमिक किंवा कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियोजन आणि प्रशासनाची व्यवस्था करण्यात आली.या स्तरावर विद्यार्थ्यांना आपापल्या पात्रते प्रमाणे व अभिरुचिप्रमाणे कला, विज्ञान, वाणिज्य व तांत्रिक शिक्षण इत्यादी शाखा निवडण्याचे स्वातंत्र्य आहे.या स्तरावर व्यावसायिक अभ्यासक्रम अधिकाधिक प्रमाणात सुरु करावेत व ज्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात आवड नाही त्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमाची निवड करावी अशी अपेक्षा होती.

अशा त-हेने कनिष्ठ महाविद्यालये किंवा उच्च माध्यमिक विद्यालये महाराष्ट्रात सुरु झाली. पण त्यांची यशस्वीपणे अंमलबजावणी होण्यास समर्थ प्रशासनाची व योग्य नियोजनाची गरज होती.

ऑक्सफर्ड शब्दकोशानुसार नियोजनाचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

" नियोजन म्हणजे कृती करण्यापूर्वी तिचा आराखडा तयार करणे. "

"Planning to design some action to be done beforehand."[३]

शैक्षणिक नियोजनाचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात.

१. नियोजनात ध्येय आणि उद्दिष्टे निश्चित करावी लागतात.

२. उपलब्ध साधन सामग्री, मनुष्यबळ आणि साधनांचा विचार करावा लागतो.

३. साधनांची उपलब्धतेच्या दृष्टीने निवड करावी लागते.

४. ध्येय साध्य करण्याच्या हेतूने साधन सामग्री, मनुष्यबळ आणि साधनांचा

सुयोग्यपणे जास्तीत जास्त पण काटकसरीने उपयोग कोणत्या पध्द्तीने करावयाचा त्या पध्द्तीची निवड करावी लागते.

५.निश्चित केलेली ध्येये किती कालमर्यादेपर्यंत साध्य करावयाची तो कालावधी निश्चित करावा लागतो.

६. आरंभापासून अखेरपर्यंत येऊ शकणा-या संभाव्य अडचणींचा विचार करुन त्या निवारण्यासाठी कोणती कृती आवश्यक आहे त्याची आखणी
करावी लागते.

७. योजनेची कार्यवाही करण्यास आवश्यक त्या पुरेशा आर्थिक सहाय्याची तरतूद करावी लागते.कोणतेही काम पूर्ण करावयाचे असेल तर योजनाबध्द आखणी करण्याची गरज आहे. उद्दिष्ट गाठण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी कराव्या लागतील त्यांचा क्रम कोणता, उपलब्ध असलेले मनुष्यबळ आणि साधन सामुग्री यांचा विचार नियोजनात केला जातो.

कनिष्ठ महाविद्यालयाचे नियोजन करताना वर्षभरात मिळणारे कामाचे दिवस, उपलब्ध असलेले प्राध्यापक, वर्षभरात पूर्ण करावयाची उद्दिष्ठे, त्यासाठी घ्यावयाचे बौध्दिक व अभ्यासानुवर्ती कार्यक्रम,कामाची पध्दती, कामाच्या जबाबदारीच वाटप व आर्थिक तरतूद यांचा विचारकरावा लागतो. कनिष्ठ महाविद्यालयाचे नियोजन केल्याने कामाची दिशा निश्चित होते. कामात एकसूत्रीपणा व शिस्तबध्दता येते.

प्रशासनात कुशल नियोजनाचा दूरगामी दृष्टीचा अविष्कार असतो. आखलेल्या योजनेप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयांची कामे पार पाडताना त्यावर नियंत्रण करावे लागते. एकंदरित अंमलबजावणी प्रशासनात असते.अंतर्गत प्रशासनात कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापंक, पर्यवेक्षक व विद्यार्थी यांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांवर प्रत्यक्ष परिणाम करणारे घटक अंतर्गत प्रशासनात असतात. बाहय प्रशासनात संस्था व शासन यांचा समावेश होतो. कनिष्ठ महाविद्यालय ज्या

संस्थेमार्फत चालविले जाते त्या संस्थेच्या नियमांचे पालन प्राचार्यांना करावे लागते. शासनाकडून कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान मिळते.

प्रस्तुत संशोधन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य,पर्यवेक्षक, प्राध्यापक, संस्था चालक व शासकीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त माहिती तसेच कनिष्ठ महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी व निरीक्षणाद्वारे करण्यात आले आहे.

१.२ समस्येची निवड :-

कनिष्ठ महाविद्यालय हे माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण यांना जोडणारा एक महत्त्वपूर्ण दुवा आहे. स्वाभाविकच या कनिष्ठ महाविद्यालयातून बाहेर पडणारा विद्यार्थी माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्टे आत्मसात करुन उच्च शिक्षणाची उद्दिष्टे ग्रहण करण्यासाठी तयार झाला पाहिजे. कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यामध्ये सुयोग्य मूल्यांची, वृत्तींची व कौशल्यांची जोपासना झाली पाहिजे.

कनिष्ठ महाविद्यालयातील काम अत्यंत निष्ठेने व प्रामाणिकपणे करण्याची प्रवृत्ती प्राचार्यांच्या अंगी असावी लागते. संशोधन प्रवृत्ती हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक झाला पाहिजे.आपल्या शैक्षणिक व अध्यापन विषयक समस्या सोडविताना उचित प्रकारचे निर्णय घेण्याची क्षमता प्राध्यापकांचे अंगी असावी लागते.

संशोधक गेली चार वर्षे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात व्याख्याता म्हणून काम करीत आहे. शिक्षणशास्त्रातील दैनंदिन अभ्यासामुळे व सेवा काळात संपर्कामुळे शिक्षणाच्या या उतरंडीमध्ये कच्चे दुवे कोणते आहेत हे संशोधकाला आढळून आले. बी.एड्.ला प्रवेश घेणारा विद्यार्थी पदवीधर असूनही किमान अपेक्षा पूर्ण करु शकत नाही. त्याच्यामध्ये ध्येयवाद नाही. बी.एड्. करावे म्हणजे कोठेतरी नोकरी मिळेल या हेतूने तो बी.एड्. पदवी प्राप्त करतो. आवड म्हणून तो बी.एड्.ला आलेला नसतो. असे संशोधकाला आढळून आले हे नैराश्य त्याच्यामध्ये का आहे, त्याला

चांगले लिहिता वाचता का येत नाही? तो पदवीधराची किमान गुणवत्ता का प्राप्त करु शकत नाही? असे विचार संशधकाला सतावू लागले. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणामध्ये काहीतरी कमतरता रहात आहे. हे शिक्षण विद्यार्थ्यांना स्वावलंबी बणवू शकत नाही. बेकारांची संख्या वाढत आहे. तरुणांत नैराश्य वाढत आहे.याचे कारण शैक्षणिक धोरण नीट राबविले जात नसावे. अशी शंका संशोधकाच्या मनात निर्माण झाली.

प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरांवरील प्रशासनामध्ये काही उणिवा निश्चितच असाव्यात असे वाटते. विशेषता सुशिक्षित बेकारी कमी करण्यासाठी १०+२ पद्धती निर्माण झाली. त्या स्तरांवरील अंमलबजावणीमध्ये कमतरता असल्याचे चर्चेवरुन, इतर विचारवंतांच्या लेखनावरुन लक्षात आले.

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणात नियोजन आणि प्रशासनात अनेक उणिवा आहेत. काही कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिक शाळांशी संलग्न आहेत. तर काही कनिष्ठ महाविद्यालये वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न आहेत. उच्च माध्यमिक शिक्षण हा माध्यमिक शिक्षणाचा भाग मानण्यात आल्यामुळे कांही निवडक माध्यमिक शाळांना कनिष्ठ महाविद्यालये चालविण्याची परवानगी मिळाली. वरिष्ठ महाविद्यालयातील पदवीपूर्ण वर्ग बंद झाल्याने अनेक महाविद्यालये आर्थिक दृष्टीने अडचणीत येणार म्हणून हे वर्ग वरिष्ठ महाविद्यालयांना चालविण्याची परवानगी देण्यात आली.

उच्च माध्यमिकचे वर्ग शाळांना जोडलेले असो किंवा महाविद्यालयांना जोडलेले असो तेथील अभ्यासक्रम,परीक्षा,शिकविणाऱ्या प्राध्यापकांची अर्हता एकच त्यामुळे शैक्षणिक पातळी समान आहे.

माध्यमिक शाळेतील वातावरण व महाविद्यालयीन वातावरण यात बराच फरक आहे. माध्यमिकच्या तुलनेत वरिष्ठ महाविद्यालयाचे वातावरण प्रभावी ठरते. माध्यमिक शाळाशी संलग्न उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थी संख्या ६० ते ८० असते तर वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थी संख्या

१०० ते १२० असते. महाविद्यालयात प्राचार्य हे प्रमुख प्रशासक असतात तर माध्यमिक शाळाशी संलग्न उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रमुख प्रशासक त्या विद्यालयाचे मुख्याध्यापक असतात. वरिष्ठ महाविद्यालयीन प्राचार्याचे अधिक लक्ष वरिष्ठ महाविद्यालयीन वर्गाकडे असते. तर माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्यांचे लक्ष माध्यमिक वर्गावर अधिक असते.

कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग, विद्यार्थी संख्या, प्राध्यापक यांचेकडे दोन्ही प्रशासनात दुर्लक्ष असते. माध्यमिक शाळाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयाच्या समस्या सोडविण्यास मुख्याध्यापकांना वेळ अपुरा पडतो. वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांचेही दुर्लक्षच दिसून येते त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयाच्या समस्या कमी होण्याऐवजी वाढतच जातात.

कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित संपूर्ण नियोजनाचे व प्रशासनाचे सर्व अधिकार शिक्षण उपसंचालक यांचेकडे सोपविण्यात आले आहेत. त्यांच्यामार्फत माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रशासनाची अंमलबजावणी करतात. माध्यमिक शाळांची संख्या जास्त आहे, कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रशासनासाठी शिक्षणाधिकारी यांना वेळ अपुरा पडतो. विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडून वर्गमान्यता, शिक्षक मान्यता, विद्यार्थी प्रवेश, वार्षिक तपासणी, कनिष्ठ महाविद्यालय मान्यता इत्यादीबाबत अंमलबजावणी केली जाते.

महाराष्ट्र राज्यात सर्व विभागात शिक्षण उपसंचालकाच्या प्रशासनाचे नियम एकसारखे नाहीत.वर्ग मान्यता, विद्यार्थी प्रवेश, वर्गातील विद्यार्थी संख्या, शिक्षक मान्यता याबाबत वेगवेगळया विभागात वेगवेगळे नियम लावले जातात.शिक्षकांची अर्हता एकच असूनही वेगवेगळया विभागांत शिक्षकांच्यात कार्यभार व वेतन भिन्नता आढळते. राज्यात सर्व विभागीय शिक्षण उपसंचालकाकडे नियम एकसारखे नाहीत.

कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यालयीन कामकाज वर्गातील विद्यार्थी संख्या, अभ्यासक्रम, वेळापत्रक, अध्यापन पद्धती, अध्यापक वर्ग, ग्रंथालय सुविधा,

प्रयोगशाळा, शैक्षणिक साधने, इमारत, फर्निचर, अनुदान पुरवठा, परीक्षा व मूल्यमापन याबाबत अनेक प्रश्न निर्माण झालेले दिसतात.

कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणारा विद्यार्थी १६ ते १९ वर्षे या वयोगटातील युवक आहे. विद्यार्थ्यावर योजनाबद्ध व योग्य पद्धतीचे संस्कार घडविणे आवश्यक आहे. त्याकरिता शिक्षक हा सर्वांगाने परिपूर्ण असावा व सुरक्षित असावा.कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी संख्येच्या मानाने वर्ग खोल्या, ग्रंथालय सुविधा, इतर साहित्या संदर्भात सुविधा अपुऱ्या पडतात. विद्यार्थी संख्येच्या मानाने वर्ग खोल्या लहान आहेत. ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी क्रमिक व संदर्भ पुस्तके नाहीत. विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी पुरेशा प्रमाणात प्रयोगाचे सामान उपलब्ध नाही. विद्यार्थी संख्येच्या मानाने इमारती कमी पडतात त्यामुळे दुबार पद्धतीने कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग भरवितात.

कनिष्ठ महाविद्यालयांकरिता विद्यार्थी संखेच्या मानाने शैक्षणिक साहित्याचा अभाव आढळतो. ग्रंथालय समस्या भेडसावतात अशा अनेक उणिवा कनिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन आणि प्रशासनात जाणवतात. त्या उणिवांचा शोध घेण्याची गरज आहे म्हणून संशोधकाने खालील विषय संशोधनासाठी निवडला.

## १.३ समस्या विधान

" बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयांचे नियोजन आणि प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास "

" A CRITICAL STUDY OF PLANNING AND ADMINISTRATION OF THE JUNIOR COLLEGES IN BARSHI TALUKA."

संशोधन हे शास्त्रीय कार्य आहे. कोणत्याही विषयाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करताना संज्ञा विशिष्ट अर्थानेच वापराव्या लागतात. संशोधन विषय अधिक स्पष्ट व्हावा व संशोधनाची मर्यादा लक्षात यावी या हेतूने संशोधनाच्या वरील विधानात वापरलेल्या महत्त्वाच्या संज्ञाच्या व्याख्या खालिलप्रमाणे दिल्या आहेत.

* बार्शी तालुका :-

बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयाचे स्थान

दर्शविणारा नकाशा.




● अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये – 14

× विना अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये – 1

□ माध्यमिक शाळांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालये

△ वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालये

○ कन्या कनिष्ठ महाविद्यालय

महाराष्ट्रातील सोलापूर जिल्हयाच्या ११ तालुक्यांपैकी बार्शी हा एक मोठा व महत्वाचा तालुका आहे. तालुक्याची लोकसंख्या तीन लाख दहा हजार आहे. बार्शी तालुक्याच्या पूर्वेस उस्मानाबाद जिल्हयातील तुळजापूर तालुका, पश्चिमेस उस्मानाबाद जिल्हयातीलच परंडा तालुका, दक्षिणेस उत्तर सोलापूर तालुका व उत्तरेस उस्मानाबाद जिल्हयातील येरमाळा तालुका येतो. एकंदरित बार्शी तालुक्याच्या तीन सीमा उस्मानाबाद जिल्हयाने व्यापलेल्या आहेत. बार्शी तालुका मराठवाडयालगतचा शेवटचा तालुका असून बार्शी शहरालामराठवाडयाचे प्रवेशव्दार म्हणून ओळखले जाते.

बार्शी तालुक्यामध्ये बार्शी शहर शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. बार्शी तालुक्यातील मोठया गावांमध्ये जी वाहतुकीच्या दृष्टीने सोयीची आहेत अशा ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालये आहेत. बार्शी तालुका हा जिल्हातुल्य तालुका मानला जातो. बार्शीमध्ये विविध शासकीय कार्यालये, न्यायालये, रुग्णालये व शिक्षणाच्या दृष्टीने तीन वरिष्ठ महाविद्यालये ,सहा कनिष्ठ महाविद्यालये, एक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, दोन अध्यापक विद्यालये, दोन बी.पी.एड्.एक बी.एड. महाविद्यालय आहे. त्या अंतर्गत एम.एड.,एम.पी.एड्., एम्.फिल.,पीएच.डी.पर्यंत उच्च शिक्षणाची सोय आहे.तसेच सोळा माध्यमिक शाळा आहेत.

बार्शी हे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. भगवंताचे भव्य मंदीर जे काशीनंतर बार्शीतच आढळते. बार्शीची बाजारपेठ महाराष्ट्रातील बाजारपेठांमध्ये अग्रगण्य मानली जाते. औद्योगिक क्षेत्रातही वेगाने विकसित होत असलेला हा तालुका आहे. सोबत बार्शी तालुक्याचा नकाशा जोडला आहे.

* <u>कनिष्ठ</u> <u>महाविद्यालय</u> :-

शैक्षणिक आकृतीबंध १०+२+३ मधील +२ स्तरास इयत्ता ११वी आणि इयत्ता १२वी चे कला,विज्ञान व वाणिज्य शाखांचे वर्ग प्रामुख्याने येतात. दोन वर्षाच्या कालावधीमधील या वर्गाचा उच्च माध्यमिक किंवा कनिष्ठ महाविद्यालय म्हणतात. हे वर्ग माध्यमिक शाळांशी आणि वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न आहेत.

* <u>नियोजन</u> :-

नियोजनाची व्याख्या हेल्पीन क्राफ्ट यांनी खालीलप्रमाणे दिली आहे. "नियोजन ही बौद्धिक प्रक्रिया असून तिच्यात हेतू, वस्तुस्थिती आणि विचारपूर्वक घेतलेल्या निर्णयांचा समावेश असतो."[४]

कोणत्याही कामामध्ये नेमके काय करावयाचे याची जर योजना केली तर काम अतिशय नियोजनबद्ध व सूत्रबद्ध पध्दतीने करता येते. कोणत्याही कार्याची मांडणी सुसूत्र,तर्कशुध्द आणि शास्त्रशुध्द केल्यास उपायांची कार्यवाही पद्धतशीरपणे करता येते.

* <u>प्रशासन</u> :-

प्रशासनाची व्याख्या ग.वि.अकोलकर व पाटणकर यांनी खालील प्रमाणे दिली आहे.

"निश्चित केलेल्या पद्धतीप्रमाणे कार्य चालविण्याच्या दृष्टीने निरनिराळया नियमांचा आणि अधिकारांचा वापर करुन एकूण कामावर नियंत्रण ठेवणे,उपलब्ध साधनसामुग्री आणि मनुष्यबळ यांचा जास्तीत जास्त आणि परिणामकारक उपयोग होईल अशा अनुरुप कार्यक्रमाद्वारे मानवी गुणांचा विकास प्रभावीपणे करण्याची प्रक्रिया म्हणजे प्रशासन होय."[५]

शैक्षणिक प्रशासनात, भौतिक सुविधा, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रशासन, विद्यार्थ्यांचे प्रशासन, आर्थिक तरतुदी, संस्था-प्राचार्य, प्राचार्य-प्राध्यापक, प्राध्यापक- विद्यार्थी, प्राचार्य-पालक संबंध, अध्यापन यासंबंधी प्रशासनाचा संशोधनाच्या दृष्टीने विचार केला आहे.

*<u>चिकित्सक अभ्यास</u> :-

" संशोधन साधनांच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे वर्गीकरण, स्पष्टीकरण, विशदीकरण करुन सदर समस्येत सुधारणा होण्यासाठी मार्गदर्शक सुचनाद्वारे केलेले अध्ययन म्हणजे चिकित्सक अभ्यास."

## १.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

प्रस्तुत संशेधनाच्या अभ्यासासाठी खालील उद्दिष्टे निश्चित केली.

१.बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील नियोजनाचा अभ्यास करणे.

२.बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्रशासनाचा अभ्यास करणे.

३.बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक प्रशासनामध्ये आढळणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

४.बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील नियोजन व प्रशासनात सुधारणा सुचविणे.

## १.५ समस्येची गरज व महत्व

कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशातील शैक्षणिक प्रगतीवरच अवलंबून असतो. शिक्षणातील विविध स्तरांपैकी " २ + स्तर " किंवा "कनिष्ठ महाविद्यालय" हा स्तर अत्यंत महत्वाचा आहे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियोजन व प्रशासनाचा अभ्यास महत्वाचा आहे.

या स्तरावर काम करणाऱ्या प्राध्यापकांकडे दुर्लक्ष झालेले आहे. त्यांच्यामध्ये उदासिनता निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन कामावर अनिष्ट परिणाम झालेला आहे. या स्तरावरील सर्व प्रशासन शिक्षकांचे हाती सोपविले जाते. या स्तरावरील शिक्षकांच्या संस्थानिहाय सेवाजेष्ठता यादया तयार करुन लावण्यात आल्या पाहिजेत जेष्ठ प्राध्यापकांची पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करण्यात यावी. व त्यांच्याकडे सर्व प्रशासकीय अधिकार द्यावेत.

माध्यमिक शाळांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना प्रशासनासाठी १२५ रुपये विशेष भक्ता दिला जातो.परंतु वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना प्रशासनाबद्दल एकही पैसा दिला जात नाही. कनिष्ठ

महाविद्यालयांच्या कार्यालयीन कामकाजात वाढ होत आहे. परंतु कार्यालयीन कर्मचारी स्वतंत्र नेमण्याची तरतूद नाही.

माध्यमिक शाळाप्रमुख फारच थोडे पदव्युत्तर पदवीधारक आहेत. त्यामुळे उरलेल्यांच्या या स्तराशी अध्यापनाचे दृष्टीने संबंध येत नाही. त्यांना या स्तरावरील प्रश्नांचे आकलन होऊ शकत नाही. वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य बी.एड्.किंवा एम.एड्. पदवीधारक शक्यतो नसतात. त्यामुळे त्यांना या स्तरावरील सर्व प्रश्न समजतीलच असे नाही.

वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे नवीन तुकडया व नवीन कनिष्ठ महाविद्यालये निर्माण होत आहेत.परंतु शासन नवीन तुकडया, वाढविण्याबाबत नकार देते, त्यामुळे वाढत्या विद्यार्थी संख्येला आहे त्या तुकडयांत सामावून घ्यावे लागते. प्राध्यापकांना अध्यापनाऐवजी विद्यार्थी संख्येला नियंत्रित करणे हेच काम करावे लागते. शासनाकडून नवीन कनिष्ठ महाविद्यालयांना परवानगी देताना विना अनुदानित तत्वावर मान्यता दिली जाते.

कनिष्ठ महाविद्यालयीन कामकाजासाठी स्वतंत्र लिपिकांची सोय नसते. मात्र कनिष्ठ महाविद्यालयांचे जनरल रजिस्टर, हिशोब, पत्रव्यवहार, दाखले इत्यादी स्वत्रंत्र पाहिजेत असा शासनाचा आग्रह आहे.

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना कार्यभार कमी असेल तर घडयाळी तासिकेवर व अर्धवेळ नेमणूक करावी लागते.त्यांना अपुरे वेतन मिळते. अपुरेवेतन असणारे शिक्षक इतर उद्योग करतात.त्याचा अनिष्ठ परिणाम कनिष्ठ हाविद्यालयाच्या निकालावर होतो. विद्यार्थ्यांवर संस्कार करणाऱ्या शिक्षकांना वेतनाची व सेवा शाश्वतीची गरज आहे. अशा प्रकारे कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासकीय समस्यावर संशोधन होणे गरजेचे आहे.

सध्याच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियोजन आणि प्रशासनात जो एक साचेबंदपणा निर्माण झालेला आहे. तो जाऊन कनिष्ठ महाविद्यालयांचे नियोजन आणि प्रशासनात बदल व्हावा. सध्याच्या नियोजन आणि प्रशासनाचा दृष्टिकोन

बदलून कनिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन आणि प्रशासन पध्दतीत आणि कार्यात या संशोधनामुळे मार्गदर्शन मिळावे हा हेतू आहे. मुख्याध्यापक, प्राचार्य, शासकीय अधिकारी यांना कनिष्ठ महाविद्यालयांचे नियोजन आणि प्रशासन प्रभावी होण्याबाबत मार्गदर्शन या संशोधनातून निश्चित मिळेल व त्याप्रमाणे त्यांना सुधारणा करता येतील.

शासनाकडून सतत दुर्लक्षित राहिलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या या स्तराकडे शासनाचे व एकूण सर्व समाजाचे लक्ष वेधून कनिष्ठ महाविद्यालयातील आजच्या समस्या त्यांना समजाव्या व या स्तराचे महत्व समजावे. येथूनच भावी डॉक्टर, इंजिनिअर तसेच विविध विभागाकडे विद्यार्थी वळतो आहे. जीवनाची दिशा ठरविणारा हा स्तर आहे. विद्यार्थ्याच्या जीवनाला पूर्ण कलाटणी देणारा हा स्तर दुर्लक्षित राहू नये ही संशोधकाची तळमळ सर्वाच्या लक्षात येईल व या स्तराची गुणवत्ता दर्जा ठरविण्यासाठी प्रशासनात योग्य बदल होईल अशी संशोधकाची धारणा आहे.

## १.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनासाठी सोलापूर जिल्हयातील बार्शी तालुका हे भौगोलिक क्षेत्र निवडले. या तालुक्यातील माध्यमिक शाळांना संलग्न १२ कनिष्ठ महाविद्यालये आणि वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न ३ अशा सर्वच १५ कनिष्ठ महाविद्यालयांची संशोधनासाठी निवड केली. एकंदर १५ कनिष्ठ महाविद्यालयांपैकी १४ कनिष्ठ महाविद्यालये अनुदानप्राप्त व १ कनिष्ठ महाविद्यालय विनाअनुदानित आहे. या १५ कनिष्ठ महाविद्यालयापुरतेच हे संशोधन मर्यादित आहे.

सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखा असलेल्या वर्गाचा विचार केलेला आहे. या सर्व कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी चे वर्ग आहेत. या १५ [illegible] असलेली सर्व कनिष्ठ महाविद्यालये आहेत. विज्ञान [illegible]

महाविद्यालये, वाणिज्य शाखेचे वर्ग असलेले १ कनिष्ठ महाविद्यालय आहे. या १५ कनिष्ठ महाविद्यालयांपैकी १ कन्या कनिष्ठ महाविद्यालय आहे.

या कनिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य वर्ग व त्यांच्या प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी यांच्या प्रशासन व नियोजना पुरतेच हे संशोधन मर्यादित आहे. या संशोधनात व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या किमान कौशल्य अभ्यासक्रमाचा व त्या विषयाचा अभ्यास केलेला नाही.

प्रस्तुत संशोधन बार्शी तालुक्यापुरतेच मर्यादित आहे. या संशोधनात बार्शी तालुक्यातील १४ अनुदानित व १ विनाअनुदानित अशा १५ कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश आहे. हे संशोधन कनिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन आणि प्रशासनापुरतेच मर्यादित आहे. हे संशोधन सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षापुरतेच मर्यादित आहे.

## १.७ प्रकरणांचे नियोजन

प्रस्तुत संशोधनाच्या प्रकरणांचे नियोजन खालीलप्रमाणे केले आहे.

**प्रकरण पहिले -**

पहिल्या प्रकरणात संशोधनाची पार्श्वभूमी समस्येची निवड, समस्येचे शब्दांकन संशोधनाची उद्दिष्टे, समस्येचे महत्व, गरज, व्याप्ती व मर्यादा याबाबत स्पष्टीकरण केलेले आहे.

**प्रकरण दुसरे -**

दुसऱ्या प्रकरणात संबधित साहित्याचा अभ्यास करण्यात आला. संबधित संशोधनाचे समालोचन करण्यात आले. सदर संशोधन कसे वेगळे आहे हे स्पष्ट केले आहे.

**प्रकरण तिसरे -**

तिसऱ्या प्रकरणात कनिष्ठ महाविद्यालयातील नियोजन आणि प्रशासनातील तात्विक घटकावर स्पष्टीकरण करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यालयीन कामकाज, विद्यार्थी संख्या, अभ्यासक्रम, वेळापत्रक, अध्यापनपध्दती, अध्यापक, ग्रंथालय, प्रयोगशाळा, शै.साधने, इमारत, फर्निचर, अनुदान, परीक्षा व मूल्यमापन या संदर्भात कनिष्ठ महाविद्यालयातील नियोजन आणि प्रशासनातील तात्विक घटकाचे स्पष्टीकरण करण्यात आले.

<u>प्रकरण चौथे -</u>

चौथ्या प्रकरणात प्रस्तुत संशोधनाची पूर्वतयारी, नमुना निवड, संशोधनाची साधने, प्रश्नावली, मुलाखती, निरीक्षण, संशोधनाची कार्यपध्दती याबाबतचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

<u>प्रकरण पाचवे -</u>

पाचव्या प्रकरणात संकलित माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि विशदीकरण केलेले आहे. कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, शासकीय अधिकारी, संस्था चालक यांच्यामार्फत मिळालेल्या माहितीचे तसेच प्रत्यक्ष भेटी व निरीक्षणातून प्राप्त माहितीचे वर्गीकरण विश्लेषण आणि विशदीकरण करण्यात आलेले आहे.

<u>प्रकरण सहावे -</u>

सहाव्या प्रकरणात संकलित माहितीवरुन केलेल्या विशदीकरणांच्या सहाय्याने निष्कर्ष काढण्यात आले. या निष्कर्षा आधारे शिफारशी करण्यात आल्या व पुढील संशोधनासाठी विषय सुचविण्यात आले.

# संदर्भ


| | |
|---|---|
| 1. | Govt. of India Report of Educational commission. (1964-66) Pune, Nutan Prakashan. Page no. 24-42, 85,86,98. |
| 2. | Educational Department, Maharashtra State1975) Resolution about ", Introduction of the Higher Secondary Pattern". No. HSC/1074/10445/ |
| 3. | दा.ता. ताम्हणकर, (१९७६), शैक्षणिक प्रशासन व नियोजन पुणे, नूतन प्रकाशन पृष्ठे, .२८९.२९० |
| ४. | अरविंद दुनाखे,हेमलता पारसनीस (१९९५), शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासन पुणे. नूतन प्रकाशन पृष्ठे, ७७. |
| ५. | ग.वि. अकोलकर, (१९८९), शालेय व्यवस्था आणि प्रशासन पुणे, नीलकंठ प्रकाशन पृष्ठे ९ ते ११. |
| ६. | ताहणकर, उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २ |
| ७. | श्री. ना. बनहट्टी, (१९६८), सुगम मराठी शब्दकोश पुणे, सुविचाार प्रकाशन मंडळ,पृष्ठ १६६. |
| ८. | प्र.न. जोशी, (१९६९), आदर्श मराठी शब्दकोश भाग-१ पुणे, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पृष्ठ ३९. |